## 'सकाळ' वर्धापनदिनी विंदांच्या प्रेमगाण्यांनी रसिक मोहरले

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. २८ : कविता विंदांची, तीही प्रेमकविता. पण तिची रूपे बहुढंगी, विभ्रमही नानाविध. शिवाय अनोख्या भावछटा नि हुरहूर लावणाऱ्या आठवणी यांचा अतूट संगमच... त्याला तितक्याच ताकदीने चढवलेला स्वरसाज नि एकेका कवितेसरशी मिळणारी उत्फुल्ल दाद... असा सुरेख, सुरेल अनुभव र सिकांनी घेतला, 'सकाळ' (मुंबई)च्या अकराव्या वर्धापनदिनी. .......

...... माटुंग्याच्या रुईया महाविद्यालयात आयोजित केलेल्या 'विंदांची प्रेमगाणी' या मैफलीत. ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या विंदांच्या प्रेमभावनेचा आविष्कार, त्याचं आणि तिचं नातं एवढ्यापुरताच मर्यादित नाही. टवटवीत कोवळं- अव्यक्त प्रेम, पहिली नजरभेट, कधी मिळणारं यश; तर कधी पदरी पडणारी उपेक्षा... निस्सीम त्यागाचं प्रत्यंतर, उत्कट भावनांचं प्रतिबिंब... ही कविता आशयघन अनुभवांचे पदर उलगडत नेते... त्याचंच लुब्ध करणारं दर्शन घडवलं प्रसिद्ध गायक, संगीतकार वसंत आजगावकर यांनी. विंदांच्या निवडक पंधरा प्रेमकविता त्यांनी सादर केल्या. दोन तास रसिक त्या अनुभवविश्वात न्हाऊन निघाले.

नुकते होते नजरेत तुझ्यादिसू लागले अवखळ पाणीनुकती होती तुझ्या जिभेवरनाचू लागली अवखळ गाणी अशा हुरहूर लावणाऱ्या आठवणीतून ही मैफल बहरू लागली. तू झुंजूमुंजू हासशीजाई-जुईचे लाजशीमी वेंधळा मग सांडतोथोडा चहा बाहीवरी हा उल्लेख होताच तुडुंब भरलेल्या सभागृहात प्रचंड हास्यस्फोट झाला.

'ओंजळीत स्वर तुझेच, अन् स्वरात भास तुझा', 'मागू नको सखया जे माझे न राहिलेले', 'भावातूर नजर तुझी भावोत्कट शब्द तुझे, आठवती अजूनी मला अजुनी ना जखम बुजे', अशा कवितांतून वेगळ्या पातळीवरच्या प्रेमभावनेचं प्रत्यंतर येत असतानाच प्रियकराला सर्वस्व वाहूनही दुसऱ्याशी संसार मांडावा लागलेल्या विरहिणीचा हुंदका रसिकांच्या मनात घर करून गेला.

या मैफलीत यशवंत देव यांच्या दोन आणि दत्ता डावजेकरांची एक संगीतरचनाही सादर झाली. आजगावकरांना निनाद आजगावकर (हार्मोनियम), कौस्तुभ आजगावकर (तबला), मिथिलेश पाटणकर (सिंथेसायझर), गौतम नाईक (तालवाद्ये) यांनी साथ केली.

'सकाळ'चे संस्थापक डॉ. नानासाहेब परुळेकर यांच्या प्रतिमेला प्रसिद्ध कवी शंकर वैद्य यांनी पुष्पहार घातला. ज्येष्ठ संगीतकार यशवंत देव, करुणा देव, विजया राजाध्यक्ष यांनी दीपप्रज्वलन केले. 'सकाळ'चे संपादक (वृत्त) चंद्रशेखर कुलकर्णी यांनी प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत केले.